# आमची शिरडीची सफर

**● ना. बा. राऊत**

इ. सन १९५३ डिसेंबर महिन्याची १७ तारीख होती. आमच्या गिरणी मधील कारकून बंधू व एक कामगारबंधू मिळून एकूण १६ गृहस्थ होतो. शिरडी येथील साईबाबांची पूजनीय स्थानें (समाधी) प्रेक्षणिय स्थळे, व निर-निराळा प्रदेश पहाण्यास मिळण्याचे सद्भाग्य व योग यामुळे सारेजण सहलीस निघालो. कामाचा दिवस होता, प्रत्येकाने आपापले काम आटपून शक्यतो लवकर निघण्याची तयारी केली. मोटारव्हॅनने जाण्यायेण्याचे ठरले होते, पण मोटार एक तास उशिरा गिरणीच्या दरवाजात येऊन ठेपली त्यावेळी साडे तीन झाले होते. आम्ही आपापल्या सामानासह मोटारीत चढलो, कोणी हातपिशवी कोणी हात-ब्याग तर कोणी वळकटी सोबत आणली होती. मोटरव्हॅन संख्येच्यामानाने लहानच जेमतेम बारा माणसे व्यवस्थीत बसू शकली असती, परंतु आम्ही सोळा-जण शिवाय मोटार क्लिनर व ड्रायव्हर, प्रत्येकाचे काहींना काहीं सामान त्या-मुळे फार चेंगराचेंगरी झाली. कोणाला या कुशिवरून त्या कुशीवर फिरण्याची मुष्किल की हातपाय खालीवर करण्याची पंचाईत जणूकाय वॅगनमध्ये सामान खच्चून भरगच्च भरतात तशी स्थिती, पण इलाज नव्हता. मोटरव्हॅनमध्ये इतकी माणसे बसू शकणार नाहीत याचीमुळी कल्पनाच नव्हती, अशा स्थितीत प्रवास सुरू झाला. सायंकाळी पावणेचारला व्हॅन सुटली. सहलीतील बंधूवर्ग वयमानाने लहानथोर तसेच मोठे अधिकारी आणि आम्हीं छोटेही होतो. लहान मोठ्या माणसांनी कसे मिसळावे ही गोष्ट मुख्यता मोठ्या माणसांच्या मनाला मुळी शिवलीसुद्धा नाहीं. त्यामुळे तर आमचा प्रवास फारच आनंदात मिळून मिसळून आणि खेळीमेळीच्या वातावरणात सुरू झाला.

गप्पागोष्टी, थट्टामस्करी, आणि गोंगाट यामुळे गाडी दुमदुमून गेली, टाळ्यांचा गजर, हास्याचे फवारे, आणि विडीसिगारेटच्या धुरांचे लोटच्यालोट सुरू झाले. गाडीच्या मागील बाजूस श्री. मारूतीमास्तर, अनंतराव, यशवंतराव, सावंत, शिवराम फाटक, (म्हातारे मास्तर) गोविंदराव वगैरे तर पुढील बाजूस आम्ही पोरं आम्हांला तर मोकळ रानच मिळाले म्हणा, त्यात हिरो किती विनोदीपात्रे किती मुख्य पात्रात केशरीनाथ म्हात्रे, बाळ प्रधान व वसंत वायर-मन वगैरे, यानीतर विनोदाचा कहरच करून सोडला, कोणी भजन गातो, कोणी अभंग गातो, तर कोणी सिनेमांची गाणी म्हणतो. नंतर भेंड्या सुरू झाल्या मधूनच व्याख्यानाची झीड उठे, त्यातच साधूसंतापासून सामान्यांपर्यंत

कुटाळक्या मग काय विचारता जो तो या सर्व विषयात इतका दंग होऊन जाई की विचारूच नका. कुठे काहीच नसेल तर फाटक मास्तरांसारखा हुकमी एक्का के. म्हात्रे व वाळ प्रधान यांच्या हातात होताच.

या जोडीने फाटक मास्तरांची थट्टा करून त्यांना तर मेटाकुटीस आणले. या दोघांनी थट्टामस्करी उखाळ्या पाखाळ्या काढाव्यात इतरांनी त्यांना साथ द्यावी. येवढे होत असतानासुद्धा त्यांच्यासारख्या देवमाणसाची सहनशिलता दांडगी ते सगळ्यांशी हसूनखेळून जमवून घेत आणि केव्हा केव्हा आपणही खोड्या करायला सुरवात करीत, तोंडात पेटविन हा शब्द माझ्या तर कायमचाच स्मरणात राहील.

प्रभाकर कोरडे त्यांचा लाडका ठेवणीतला होता. पण तोही केव्हा इतरांना साथ देई. आणि अधिकच हास्याचे फवारे निघत. आम्ही मनसोक्त आनंद लुटू.

एका गोष्टीमुळेच प्रत्येकाच्या मनाला यातना होत असत ती गोष्ट म्हणजे हालचाल करता येत नसे की उठता अथवा चांगले बसता येत नसे. हिवाळ्याचे दिवस होते म्हणून बरे, नाही तर जीव रडकुंडीस आला असता.

हास्यविनोद, सिगारेटच्या धुराचे लोट, पानसुपारीची चंगळ, यामुळे तर प्रत्येकजण शारीरिक यातना पार विसरून गेला होता. गाडीतून कोणीतरी पान खाऊन वाऱ्याच्या झोतावर पिचकारी सोडली नी मागे गाडीच्या बाहेर हात काढून बसलेले श्री. जोग यांच्या शर्टची बाही स्प्रेपेंट झाली.

मोटार वेगात मार्गक्रमण करीत होती, इतक्यात पुढील उजव्याबाजूचे टायर पंक्चर झाले. त्यामुळे थंडीत कुडकुडत रहण्याची पाळी आली, व पाऊण एक तासानी गाडी धावू लागली.

श्री गजाभाऊ म्हात्रे यांना बसल्या बसल्या पेंगण्याची सवय पण इतरांची हालचाल आणि गाडीचा वारंवार धक्का यामुळे डुलकी येणे जमेना. नंतर त्यांनी नामी युक्ति काढली, इलेक्ट्रीक वायरमन वसंत मध्यभागी बसला होता. त्याच्या पाठीची उशी व इतरजणांच्या पायाचा पाळणा करून ते तर सपशेल आडवे झाले. माझा पाय अधिकच चेंगरला. ओढून काढायचीसुद्धा सोय नव्हती.

अशा स्थितीत गाडी एकदाची नासिककडे निघाली. आले एकदाचे नासिक स्टेशन, प्रत्येकाने सुटकेचा सुस्कारा सोडला. आम्ही सारे खाली उतरलो. साधारणता ९॥ चा सुमार झाला होता, भुकेमुळे पोटात कालवाकालव होत होती. श्री. हजारे यांच्या माहितीतील एका सुंदर हॉटेलात गेलो. हॉटेलचं नाव "रॉयल रेस्टॉरंट" होतं असं वाटतं, येथे शाकाहारी व मांसाहारी अशी दोन्ही कडेची सोय होती. बहुतेकजण शाकाहारीत बसले. इतर आम्ही सहाजण

मांसाहारीत. जेवण काही नाव ठेवण्यासारखं नव्हतं यथेच्छ समाचार घेतला. पाव, चपात्या, बिरयाणी, स्पेशल मटण, अंडा आम्लेट, काळजी वगैरे. इकडे शाकाहारीत वरणभात, आंबटी, पुरीभाजी, दही, पापड, लोणची वगैरे, मागाहून मात्र दोघेतिघे चुटपुटले, झाली गोष्ट होऊन गेली. मांसाहारीमुळे बिलाचे पैसेही अंदाजापेक्षा दुपटीने वाढले. गोविंदरावांनी मुकाट्याने बिल चुकते केले. आणि या महागड्या दुकानात पुन्हा पाऊल ठेवायचे नाही असे ठरविले.

रात्रीची वेळ. पुढे शिर्डीचा ८० मैलांचा प्रवास मध्येच चहाकॉफी काहीच मिळणार नाहीं, हे माहितच होत. तिघांनी थरमास आणला होता एकात कॉफी व दोनात चहा घेतला होता.

दहाच्या सुमारास आमच्या मोटारीने नाशिक सोडले, आणि शिरडीचा मार्ग सुरू केला. वाटेत थोडाथोडा चहा घेऊन आळस घालविला, पुढे रात्र संपता संपेना. पहाटेच्या सुमारास आलो एकदा शिरडी मुक्कामी.

थंडी फारच पडली होती. फाटक मास्तरांनी आपली हिरव्या रंगाची गरम शाल काढली, श्री. गजाभाऊ म्हात्रेने गरम कोट चढवला, आम्ही प्रत्येकाने उबदार वस्त्रात अंग लपेटून घेतले. आमच्यापैकी काहीजण शिरडीला पहिले वहिले. त्यामुळे नाविन्यता आणि अधिक उत्साह वाटत होता. अशा पवित्र क्षेत्रात मला पुढील गोष्ट आढळून आली कोणी थकलेला, कोणी दुःखी, कष्टी, कठोर, निरुत्साही गरीब अथवा श्रीमंत असो, प्रत्येकाच्या मुद्रेवर प्रसन्नता दिसे. मुले आनंदाने नाचत बागडत आणि स्त्रिया निष्पाप बुद्धीने व मोकळे-पणाने आपापल्या उद्योगात रमलेल्या दिसत. हे पाहून धन्यताच वाटली मला.

सकाळचे पाच वाजले घंटा निनादू लागल्या, काकड आरती सुरू झाल्याचे समजले. आम्ही सारे आरतीस गेलो. आरती आटोपल्यावर आंघोळीची घाई लागून राहिली होती. एक आणा प्रत्येकी देऊन आंघोळीचे तिकीट घ्यावे लागे. व तडक बाथरूमची वाट. त्या ठिकाणी यात्रेकरूंची बेसुमार गर्दी झाली होती. जो तो आपापले स्नान व इतर विधी आटपून घेण्याच्या घाईत, प्रत्येक बाथ-रूमवर विसपंचवीस माणसांच्या रांगा लागल्या होत्या, आम्ही सारे त्यांच्यात सामिल झालो. थोड्यावेळाने माझी पाळी आली. गरम पाण्याची बादली घेऊन उरकली एकदाची आंघोळ. काहीवेळाने इतरही आमचे बंधू मोकळे झाले. रस्त्या-वर चहावाल्याने आपला थाट मांडला होता. कढत चहा घशाखाली उतरविल्या-वर थोडे हायसे वाटले व जागरण आणि शिणही नाहीसा झाला.

थोड्याचवेळात साफ उजाडले. प्रत्येकाने नारळ व फुलांचे हार घेऊन बाबांच्या समाधिस्थानी व नंतर बाबा बसत त्या शिळेला वंदन करून बाबांच्या

अन्य पवित्र स्थळांचे दर्शन घेतले. काहींनी धर्मदाय फंडास देणगी तर काहींनी अभिषेक केला. इतकं होता होता आठ वाजले, आम्हाला पुढील प्रवासाची घाई लागून राहिली. होती, श्री. मारूती मास्तर, अनंतराव, यशवंतराव व गजाभाऊ म्हात्रे यांचे म्हणणे आपण दुपारपर्यंत राहून बाबांचा प्रसाद (अन्न) घेऊनच निघूया पण आम्ही ते मानले नाही. प्रत्येकाने पेढे, लाडूथा वगैरे घेऊन मोटारीत बसलो. मोटार सुटली ती थेट शिरडीपासून चार मैलावर साकोरी नावाचे गाव आहे. त्याठिकाणी थांबली. तेथे उपासनी महाराज होऊन गेले. त्यांचे पवित्र क्षेत्र पहाण्याचे भाग्य आमच्या पदरात पडलं. तिथे आम्ही पोहोचलो इतक्यात उपासनी बाबांची पालखी निघाली होती. आठवड्यातून एकदाच पालखी निघत असते. सुदैवाने तो योगायोग आम्हास लाभला, आम्ही मिरवणूकीत मिसळलो, व दरवाजातून आत प्रवेशकर्ते झालो. तेथे बरीच पवित्र स्थळे पाहिली. त्या-ठिकाणी सती गोदावरीदेवी नावाची उपासनी बाबांची शिष्या (मानलेली मुलगी) आहे त्या कोणाही यात्रेकरूनां स्वतःचे दर्शन घेऊ देत नाहीत पण आमचे दैव म्हणा किंवा सुयोग म्हणा तेथील कोणी श्री. अनंतरावांचा निकटचा स्नेही भेटला. त्या सद्‌गृहस्थाने उपासनी बाबांविषयी व इतर पवित्र स्थळां-विषयी खूप माहिती सांगितली व सती गोदावरीदेवींचे प्रत्यक्ष दर्शन घडवलं. हा सर्व भक्ति सोहळा पार पाडून आम्ही पुढची वाट धरली.

सुमारे साडेबारा झाले होते. पोटात अन्नाचा कणही नव्हता. दहाबारा मैल अंतर कापल्यावर मनमाड आले हे मध्यरेल्वेचे फारच मोठे जंक्शन आहे. तेथे मालाची चढ उतार व आयात निर्यात मोठ्या प्रमाणात होत असते. स्टेशनला लागून दिवाडकर यांचे हॉटेल व खानावळ आहे. जेवण हमखास मिळेल या आशेने सारे गेलो, पण जेवण शिल्लक नाही, दोन वाजता जेवण कोठून मिळणार ! अगोदर आम्हाला टेलीफोनवरून कळविले असते तर तशी व्यवस्था केली असती असे हॉटेलचा व्यवस्थापक म्हणाला. पाहिजे तर पुरीभाजी तयार करून देऊ. आम्ही सगळेच भात खाणारे शेवटी निराशेने मागे फिरलो.

मोठ्या रस्त्यावर जेथे व्हॅन उभी होती तेथे आलो. नाक्यावर दोनतीन दुकाने होती, तेथे चौकशी केली पण व्यर्थ. नंतर एका हॉटेलात पाचसहा व इतर आम्ही एका सिंध्याच्या का कोणाच्या दुकानात शिरलो गरजेला अक्कल नसते ना ? त्याप्रमाणे तेथील आंबलेला पाव व उसळ घेऊन पोटात थोडी भर टाकली. गजाभाऊ म्हात्रे तर खादाड प्राणी. भुकेमुळे त्याने तापच घेतला.

नंतर व्हॅन मध्ये येऊन बसलो आणि तेथूनच आमच्या प्रवासाचा उत्तरार्ध सुरू झाला, व दुर्दैव पाठोस लागले. कलहाची ठिणगी पडली व त्याचा विपर्यास

भांडणात झाला. सहलीचे नेतृत्व श्री. गोविंदरावांकडे होते, पण सारी व्यवस्था श्री. हजारे पहात असत.

पूर्वी ठरल्याप्रमाणे आमचे टाईमटेबल घसरलेच होते. त्यामुळे ठरलेला कार्यक्रम पार पडणार नव्हता, कारण दुसऱ्या दिवशी सर्वांनाच कामावर रूजू व्हायचे होते पण आमचे उपनेते श्री. हजारे यांनी निक्षून सांगितले की काही असो. ठरलेला कार्यक्रम पार पडलाच पाहिजे, तुम्ही सर्वजण ठरलेल्या कार्यक्रमाला बांधलेले आहात, तेव्हा कोणाचेही काही म्हणणे ऐकण्याची माझी तयारी नाही. नाहीपेक्षा हा मी एकटाच निघालो. तुम्ही पुढे काहीही करा. यावरून गजानन म्हात्रेशी जोराचा खटका उडाला. तसेच यशवंतराव व हजारेंची जुंपली. श्री. हजारे प्रमाणे श्री. बाळ प्रधान यानेही कायद्याचा किस काढला. या दोघांनाही श्री. मारूती मास्तर यांनी समज दिली. श्री. हजारे मुळीच ऐकून घेण्याचे तयारीत नव्हते.

ते तडक मोटारीतून उतरून जाऊ लागले. तेव्हा गोविंदरावांनी पाठोपाठ जाऊन त्यांच्या म्हणण्याला रूकार देऊन त्यांना परत आणले.

गाडी पुढे निघाली. थोडे अंतर तोडल्यावर पेट्रोल संपल्याचे ड्रायव्हरने सांगितले, जवळपास पेट्रोलपंप नव्हता, मोठी पंचाईत झाली. श्री. हजारे खाली उतरले व त्यांनी मालवाहतूकीच्या एकदोन मोटारवाल्यांस थांबण्याचा हाताने इशारा केला. त्यांचे मिलीटरी टाईपचे लांब हाताचे गरम जॅकेट, खाकी पॅन्ट बूट व डोकीत हॅट फक्त उणीव रिव्हाल्वरचीच. त्यांना पाहून व त्यांचे लष्करी बाण्याचे बोलणे ऐकून पेट्रोल देण्याचे कबूल केले.

पेट्रोल भरले गाडी स्टार्ट झाली, व सायंकाळी सव्वासहाला नाशिकला आली. आम्ही मंडईत (बाजारात) गेलो. कोणी भूईमुगाच्या शेंगा, पेरू, ऊस, तर कोणी ओला हरबरा, फ्लॉवर, वगैरे घेतले. इतक्यात दिवेलागणी झाली. म्हणून व्हॅनमध्ये येऊन बसलो.

मंडईतून गाडी निघाली. श्री. हजारे यांच्या आज्ञेप्रमाणे त्रिंबकेश्वराकडे निघालो. तीनचार मैलांची भरारी मारल्यावर आपण कुठे भलत्याच रस्त्याला जात आहोत असा किंचित संशय आला वाटेने जाणाऱ्या वाटसरूकडे चौकशी करता रस्ता चुकल्याचे समजले.

गाडी परत फिरली व चार मैल मागे येऊन त्रिंबकेश्वराकडे चालली. नाशिकहून हे मुक्काम अठरा मैल दूर होते. पण सडक चांगली नव्हती त्यामुळे गाडी ताशी १५ मैल वेगाने चालत होती. आठ मैल पुढे गेल्यावर चढण लागली रस्ता अरुंद व नादुरूस्त होता. दुरुस्तीचे काम चालू होते. एका बाजूला दगड माती व खडी ओतून ठेवलेली होती. पुढचा रस्ता चढणीचा व चिंचोळा लागला.

इतक्यात गाडी एकाएकी डाव्या बाजूस कलली, सर्वांच्या छातीत धस्स् झाले. भयाण काळोख पसरला होता. रस्त्याच्याकडेला किंवा आजुबाजूस सुद्धा दिवाबत्तीची मुळीच सोय नव्हती, अशा परिस्थितीत पुढचा पल्ला गाठणे ड्रायव्हरच्या आटोक्याबाहेरील होते. मागेजावे तर रस्ता अरुंद व अडचणीचा तेव्हा सर्वांनी गाडी ढकलून वळवुन घेतली, व गाडीची वाटचाल सुरू झाली.

रात्री साडेनऊच्या सुमारास नासिकला आलो. पोटात भुकेने तिडीक उठली होती, ती शमविणे हे आमचे प्रथम कर्तव्य होऊन बसले होते. तेथील एका चाळीच्या पहिल्या माळचावर गुजराथी खानावळीचा बोर्ड वाचला, गजानन म्हात्रे व शिवराम फाटक खेरीज आम्ही सारेजण खाणावळीत गेलो. गजानन म्हात्रे तर तापाने फणफणत होते. तेथे गेल्यावर दही, ताक, भात आमटी, वगैरे खाण्याची सर्वांनी इच्छा प्रदर्शित केली, कारण दुपारच्या प्रवासाचा त्रास व शीण दहीताकामुळे दूर होईल अशी खात्री होती. खानावळवाल्याकडे चौकशी करता तो म्हणाला, चालू ताट आठ आणे व पोटभर बारा आणे. आमच्यापैकी कोणीही आढेवेढे न घेता कबूल केले. पण एका अटीवर. चपाती ऐवजी भात किंवा भात भरपूर त्याने ते कबूल केले, पण अनुभव उलटाच आला व पुढ्यात पडेल त्यावर समाधान मानून उठलो.

अनंतरावांनी पानसुपारीची चंची सोडली, आम्ही मुखशुद्धी करून मुंबईच्या वाटेला लागलो. रात्री दहाचा सुमार झाला होता, गाडीची दौड सुरू झाली, जाता जाता अकरा वाजले. ड्रायव्हरच्याने मोटार हाकवेना, त्याचे डोळे जागरणामुळे तारवटले होते. मध्येच त्याला झोपेची तिरीप येई व डोळे पेंगू लागत. कडेलाच श्री. हजारे बसले होते ते दक्षतेने पुढील काळोखातील रस्ता व ड्रायव्हरच्या हालचालीकडे लक्ष ठेवीत, एकदोनदा त्यांनी ड्रायव्हरला सावधगिरीने गाडी हाकण्याचा इषारा केला. परंतु त्या बिचाऱ्याचा इलाज नव्हता, तीसबत्तीस तास त्याला झोप किंवा विश्रांति ठाऊक नव्हती. तेव्हा तो तरी काय करणार ? त्याने दोन तास झोप काढावी असे सर्वानुमते ठरले, गाडी थांबविण्यात आली, ड्रायव्हर झोपी गेला. आम्हीही खाली उतरून रस्त्याच्याकडेला आडवे झालो, कारण हातपाय तर खिळल्यासारखे झाले होते. तेव्हाकुठे थोडस हायस वाटले. घड्याळात एक वाजला होता. ड्रायव्हरला उठवून गाडी चालू केली.

पुढचे काही मैलांचे अंतर तोडल्यावर एका वळणावर चौकीवरील पोलीस शिपायाने गाडीच्या मागील बाजूस आवाज होत असल्याचे सांगितले. गाडी थांबवून तपासणी करता चाकाचे नटबोल्ट ढिले झाल्याचे समजले. ते व्यवस्थित केले.

**हा पोलिस शिपाई कोण, आणि येवढ्या अपरात्री येथे कसा, व काहीतरी बिघाड झाला आहे हे त्याला समजले केव्हा ही सर्व घटना चमत्कारिक व आश्चर्य वाटण्याजोगी होती. सुचना करणारी व्यक्ती कोणी अद्भूत शक्ति तर नव्हती ना ?**

प्रसंग फार आणीबाणीचा होता, बाबांची कृपा म्हणून टळला नाहीतर आम्ही गाडीसकट खोल दरीत. पुढील प्रसंग आठवला तर अंगावर शहारे आल्याशिवाय रहात नाहीत, म्हणून वर्णन न करणे उचित.

पुनः भरवेगात गाडी भराभर रस्त्याला मागे टाकून पुढे चालली होती. डोंगराळ रस्त्याची चढण संपून उतरण लागली. हळूहळू गाडी पायथ्याशी येते तोच क-डा-ड असा आवाज झाला. गाडी खरपटत पंचवीस यार्ड पुढे गेली. मागील कोपरा पार कलला होता. रात्री सुमारे अडीच झाले होते. बहुतेकजण बसल्या बसल्या पेंगत होते एकाएकी जबर धक्का बसावा तसे झाले, व एकमेकांवर आदळले. भराभर गाडी बाहेर सारे आलो. कुणाला काही मार वगैरे लागल्याची विचारपूस केली. पण तसे काहीं विशेष नव्हते. तेवढेच समाधान.

नंतर गाडीची पहाणी केल्यावर मागील ॲक्सल मोडून डाव्याबाजूचे चाक लांब कुठेतरी उडाले होते.

ईश्वराच्या कृपेने पुनः एकदा मरणाच्या दाढेतून बचावलो. आता पुढे काय ? हा प्रश्न आ वासून आमच्यापुढे उभा राहिला. सकाळी तर सर्वांनाच कामावर जायचे होते, आणि दुसरी व्हॅन मिळण्याचे मुळीच साधन नव्हते, फक्त माल वाहतूकीच्या लॉऱ्यांची ये जा सुरू होती. एका लॉरीवाल्यास विनंती केल्यावर दोघांना घेऊन जाण्याचे त्याने कबूल केले, मोटारीच्या मालकाला अपघाताबद्दल कळविण्याचे आमचे प्रथम कर्तव्य. त्याप्रमाणे मोटारक्लीनर व श्री. हजारे पुढे क्रमाने इतर मुंबईस जाण्यास निघाले. एकामागून एक सारख्या मालाच्या मोटारी येतच असत. त्यामुळे बहुतेकांना वेळीच निघता आले.

मला जी लॉरी मिळाली ती चिक्कार भरलेली वर ताडपत्री टाकून दोरीने करकच्चून बांधलेली होती. गाडीवाल्याने आम्हांस नजिकच्या रेल्वे स्टेशनवर नेऊन सोडण्याची तयारी दर्शविली. ड्रायव्हर शेजारी जागा करून आम्ही यशवंतरावांना बसविले. श्री. चंद्रकांत पेडणेकर, पाटकर, सोसायटीचा नाईक व मी लॉरीवर सामानास चढलो, व घोरपडीसारखे चिकटून दोऱ्या हातात घट्ट धरल्या. वारा तर सोसाट्याचा सुटला होता. पहाटेची वेळ थंडी बोलता सोय नाही. हातपाय गारठले होते तीनचार मैल गेल्यावर लॉरी थांबली, व उतरण्याचे फर्मान निघाले. आम्ही निमूटपणे खाली उतरलो व दोन रुपये त्याच्या हातावर ठेवले. जवळ स्टेशन कोणते आणि कोठे आहे याबद्दल ड्रायव्हरला विचारले त्याने अंगुली निर्देश करून समोर जा खर्डी स्टेशन मिळेल.

त्याप्रमाणे स्टेशनच्या मार्गाने निघालो पुढे गेल्यावर पायाखालील रस्ता उलट दिशेला जात आहे असे वाटले. समोरच जवळ जवळ दोड मैलाच्या अंतरावर विजेच्या दिव्याचा लख्ख प्रकाश दिसत होता. वाटले हेच ते खर्डी स्टेशन म्हणून त्याच दिशेने पाऊले टाकण्यास सुरुवात केली. अडीचतीन फर्लांग चालल्यावर किरकोळ झाडी व उंचसखल भाग लागला. माझ्याकडे तसेच पाटकर, चंद्रकात व यशवंतरावांकडे बेताचेच सामान होते. फक्त नाईककडे वाजवीपेक्षा जास्त पत्र्याची बॅग, करंडी, त्यात पेरू, भाज्या, ऊसाचे कांडके वगैरे होते.

अंधार इतका दाट पसरला होता की समोरचे मनुष्यच काय पण इतर काहीच दिसत नव्हते. त्यामुळे नाईक वीसपंचवीस फूट मागेच राहिला, मी व पेडणेकर यशवंतरावांचा हात धरून तर पाटकरने त्यांची पिशवी घेऊन चाललो होतो, नाईक मात्र सारखा राऊत राऊत चंद्रकांत, पाटकर अशा हांका मारित येत होता, त्याला आम्ही सारखा धीर देत होतो.

असाच सारखा पुढे ये जपून पाऊल टाक इतक्यात आ-ई-ग असा घोगरा आवाज कानावर आदळला. चटदिशी चंद्रकांत व मी यशवंतराव व पाटकरला तसेच सोडून मागे वळलो तो नाईक खळग्यात पडलेला सामानही पडले होते. चंद्रकांतने त्याला हात देऊन उठविले. मी त्याची करंडी व चंद्रकांत ने बॅग घेऊन वाट चाचपत पुढे सरकू लागलो, एकमेकांना नावाने हाका मारीत चाललो होतो, नाईकचे अंग थरथर कापत होते. लहान मुलासारखा त्याला कुशीत घेऊन तोंडाने धीर देत चाललो होतो.

पुढे तर आमच्याने चालवेना. शेताची उंच सखल वरकस जमिन तुडवित चालावे लागे. समोरचा प्रकाश तेवढा स्वच्छ दिसत होता. फारतर दोन फर्लांग अंतर असावे पण अंधारातून जावे कसे एकाजवळही टॉर्च नव्हता, तेव्हा आम्ही उजेडाच्या दिशेने मोठमोठ्याने ओरडायला सुरवात केली, घशाला कोरड पडली होती. तरी ओरडण्याचे थांबविले नाही. तेव्हा कुठे कुणीतरी एक कंदील घेऊन पुढे सरकल्यासारखे वाटले. थोडा धीर आला. त्या उत्साहाच्या भरात यशवंतरावांनी एक दोन पाऊले पुढे, तो काय ? कोणीतरी सहज उभा विहिरीत पडावा तसे झाले. त्यामुळे सर्वांचाच थरकाप उडाला. यशवंतराव सहासात फूट खोल दरीत पडल्याचे साधारण त्यांच्या शुभ्र कपड्यांवरून दिसले. लगेच माझ्या हाताला धरून चंद्रकांत हळूवार खाली उतरला. तावडतोब मीही उतरलो व त्यांना खांद्याचा आधार देऊन नीट उभे केले. ते तर स्तब्ध उभेच, बोलता किंवा नीट श्वासोच्छवास सुद्धा त्यांना घेण्याचे त्यांच्यात त्राण नव्हते, कंबर तर खचल्यासारखी वाटत होती. तेव्हा आमची सर्वांचीच धारण बसली आणखी

मुखावाटे शब्दही बाहेर पडेना, इतक्यात समोरील विजेचे दिवेही मालवले गेले. पॅन्टच्या खिशातून काड्याची पेटी काढली, पण तीत फक्त एकच काडी होती. कारखान्याच्या बाजूला कंदीलवाला, उभा असल्याचे दिसत होते. आम्ही कोठे आहोत हे मात्र तो पाहू शकत नव्हता. तेव्हा माझ्याकडील काडी पेटवून त्या दिशेला धरली त्या दिशेने तो कंदीलवाला व दुसरा एक माणूस येऊ लागला. आम्हीपण हळुहळू पुढे सरकू लागलो. कंदीलवाला जवळ आला त्यांच्या सहाय्याने अडचणीतून अगोदर प्रकाश दिसला होता तेथे आलो, आमच्या कल्पने-प्रमाणे ते स्टेशन नसून कसलातरी कारखाना होता, त्या सहाय्यकारी माणसां-च्या भाषेवरून ते गुरखे होते. त्यांना आम्ही सारी हकिकत सांगितली. आम्हाला तर विश्रांतीची फारच आवश्यकता होती. आणि खर्डीला येणारी गाडी तासा-भराने होती, तेव्हा काही झाले तरी प्रथम स्टेशन गाठूया असे ठरले, कारण ती गाडी चुकल्यावर दुसरी गाडी दुपारी बारापर्यंत नव्हती. नंतर तो कंदिल-वाला माणूस स्टेशनपर्यंत सोबत आला, त्याचे आभार मानून स्टेशनात गेलो.

चादर अंथरली व यशवंतरावांना आडवे पडण्यास सांगितले, त्यांचे हातपाय ओढले, ताणले, कंबर रगडली व पांघरूण देऊन मी व नाईक तिकीट ऑफिसला जाऊन तिकीटे आणली. गाडी येण्यास अर्धा तास अवकाश होता, प्लॅटफॉर्मवर एक पोर्टर शेकोटीकडे शेकत बसला होता. मी सिगार काढून बिस्तवावर पेटवून एक दोन झुरके मारले, चहाचे तर दुकानच नव्हते. नजरेसमोर घड-लेल्या भयंकर आठवणी सारख्या उभ्या रहात, नाईक स्वस्थ पडला होता. तेथे कोणी शुभ्रवस्त्र परिधान केलेली पिशाच्च दिसल्याचे सांगितले. त्याच प्रमाणे पाटकरनेही आपल्याला तसाच काहीतरी भास झाल्याचे सांगितले. इतक्यात आगगाडी आली सामानासह गाडीत चढलो. गर्दी मुळीच नव्हती, मोकळेपणाने पाय लांब करून झोपता आले.

वाचकहो, चला आपण मोटार अपघात स्थळी जाऊ. तुम्हांला माहितच असेल आमच्या प्रमाणे श्री. अनंतरावही एका लॉरीत बसून निघाले होते. त्यांची काय दशा झाली असेल याची कल्पना आपणास मुळीच नसेल तेव्हा त्यांच्या मागे जाऊन काय हकीगत घडली तो पाहूया. लॉरीवाल्याने अनंतरावांना शहापुर स्टेशनपासून काही अंतरावर मोटार रस्त्यात सोडले. त्यांच्या सोबतीला दुसरा कोणीच नव्हता, भयाण काळोख रात्री तीनचा सुमार आजूबाजूला घर किंवा दुकानही नव्हते. स्टेशन किती दूर आहे हे ठाऊक कोणाला ?

कितीही दूर असो, असा निश्चय करून ते निघाले थोडे पुढे गेल्यावर दोघे वाटसरू आपल्यापुढे चालत असल्याचे त्यांना दिसले. बरी सोबत झाली असे म्हणून त्या दोघांना गाठण्याचा ते प्रयत्न करू लागले. पण त्या माणसांचा

काहीतरी भलताच गैरसमज झाल्याचे दिसले. तेव्हा ते अधिकच जोराने चालू लागले. इतक्यात समोरून एक बैलगाडी व तीत पोलिस शिपाई दिसला त्याच्या कडे अनंतरावांनी स्टेशन किती दूर आहे, अशी चौकशी केली व घडलेली सर्व हकीगत सांगितली. तो गाडीवाला व पोलीसाने अनंतरावांना शहापुर स्टेशनवर आणून सोडले अनंतराव चहा घेण्यासाठी पुढे आले, त्यांना चहा देण्यासाठी मागे वळून पहातात तो काय बैलगाडीही नाही, की त्या माणसांपैकी कोणी नाही. मोठा चमत्कारच म्हटला पाहिजे. म्हणतात ना आंधळ्याला काठीचा आधार, त्याप्रमाणे बाबा संकटाच्यावेळी कशावरून धाऊन आले नसतील. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होईल काय ?

पहाटेपूर्वीचा काळोख संपून सूर्योदय झाला. श्री. गोविंदराव हे एस. टी. सर्व्हिसने भिवंडीस गेले. तेथून त्यांना सर्व्हिस गाडी मिळेना, खास भाड्याने मोटार करून त्यांना कुर्ल्याला यावे लागले. इथपर्यंत येऊनही त्यांच्या मागे गृहदशा होतीच. त्याच दिवशी दुपारी घाटकोपर येथे आगगाडीचा अपघात होऊन वाहतूक बंद पडली होती. आगगाडी बंद असल्यामुळे बसला फार गर्दी, त्यामुळे त्यांना फारच त्रास सोसावा लागला.

इकडे मोटार ड्रायव्हर, के. म्हात्रे बाळ व गजानन म्हात्रे इतकेजण सर्वांच्या मागे होतेच इतरांप्रमाणे त्यांनाही लॉरीतून लवकर जाणे शक्य होते, पण मोटार ड्रायव्हर मागे रहाता, शिवाय रात्रीची वेळ आणि दुसऱ्याची मोटार चोरलुटारूंची भिती, त्यामुळे त्यांना चांगले उजाडेपर्यंत तेथेच रहावे लागले. पण पुढे दिवस उजाडल्यावर बहुतेक थांबतो. लॉरीची वाट पहाता पहाता आठ वाजले. लॉरी येण्याचे चिन्ह दिसेना, शेवटी एक बैलगाडी येत होती. तीमध्येच बसून गजानन म्हात्रे निघाले होते. त्याना अजूनही ताप होताच. के. म्हात्रे व बाळ प्रधान गाडीच्या मागून चालले होते, पुढे शॉर्टकट रस्त्याने के. म्हात्रे व बाळ पुढे येऊन चहा घेत असल्याचे गजाननने पाहिले. ते विचारात पडले की हे दोघे आपल्या मागे असून पुढे कसे व केव्हा आले. इतक्यात एस. टी. आली. शेवटी ते वैतरणा व पुढे भिवंडीची वारी करून हे त्रिकूट मुंबई मुक्कामी सुखरूप येऊन दाखल झाले.

तात्पर्य एकामागून एक असे अनेक घोर प्रसंग आणि अडचणी येऊनही, आपण सर्वजण ईश्वराचे कृपेने सुखरूपपणे परत आलो. त्याबद्दल आपण ईश्वराचे तसेच श्रीसाईबाबांचे आभार मानू या. !

## श्रीसाईबाबांना प्रसन्न असलेली पारडशिंग्याची

# श्री सती अनुसया माता

**डॉ. अनिल.** नागपूर



● **डॉ. अनिल** नागपूर

वाचकांनो, आपणास माहीतच असेल की श्री नरसिंहस्वामी नावाची एक थोर विभूति द. भारतात होऊन गेली व त्यांनीच आपल्या श्रीसाईबाबांच्या लीलेविषयी चोहीकडे प्रचार करण्याची फार मोठी कामगिरी बजाविली. त्यांनी लिहिलेली पुस्तके आंग्लभाषेत असल्याकारणाने पाश्चात्य देशात सुद्धा श्रीबाबांची कीर्ती पसरली. अर्थातच श्रीबाबांनी हे काम त्यांचेकडून करुन घेतले, हे सांगणे नकोच. कमीत कमी वर्तमान सुशिक्षित साईभक्तांत त्यांचे नाव माहीत नसणारी व्यक्ति सापडणे कठीणच. हल्लीच शिर्डी संस्थानने त्यांच्या कार्याचा गौरव करून थाटाने त्यांची छबी श्रीसाईबाबा समाधिमंदिरात लावली आहे. अशा या थोर विभूतिद्वारे लिहिलेल्या अनेक ग्रंथांपेकी "श्रीसाईबाबा चार्टस् अँड सेयिंग्ज" हा एक ग्रंथ आहे. याच ग्रंथात पृ. ३५६ क्रमांकावर उल्लेखित संदर्भात श्रीसाईबाबांची अन् अनसूया मातेची एकरूपता त्यांनी उद्घोषित केलेली आहे त्याचप्रमाणे वरील पुस्तकाचे हिंदी अनुवाद "श्री साईवचनामृत" मध्ये श्री. ठाकूर शिवरामसिंह यांनी वरील गोष्ट २९५ क्रमांकावर मांडलेली आहे. ही पुस्तके चाळत असताना साहजिकच माझ्या डोक्यात विचार आले की नागपूर जिल्हयात काटोलपासून ६ मैलावर असणाऱ्या पारडशिंगा या गावी हल्ली प्रत्यक्ष वावरत असणाऱ्या सती अनसूयामातेबाबत आपले काही अनुभव वाचकांसमोर सादर केल्यास श्रीसाईबाबा त्यांच्याशी एकरूप असल्याकारणाने ही लेखरूपी क्षुल्लक फुलाची पाकुळी अवश्य स्वीकारतील याच दृष्टिकोन व उद्देशाने मी विमूढ, अल्पमती प्राण्याने आपले विचार आपणासमोर मांडण्याचे,

धाडस केले आहे. माझा हा अल्प प्रयास आपण गोड करून घ्याल हीच वाचकांना नम्र विनंती.

वाचकबंधूंनो ! मागील १॥–२ वर्षापूर्वीची गोष्ट. दर खेपेस नवरात्रेत एकदा तरी नागपूरजवळील श्रीक्षेत्र कोराडी येथे श्रीमहालक्ष्मीदेवीच्या दर्शनाला जावे व यथाशक्ति तिचा शृंगार करावा हे माझे एक प्रकारचे वेड. एक प्रकारचे मनोरंजन. परंतु काही कारणास्तव एकदा देवीला परकर नेणे मला जमले नाही. श्रीदेवी स्वप्नात आली, व एका स्त्रीकडे बोट करून म्हणते, "का रे तू मला नेसविले नाहीस. काही हरकत नाही. परंतु हिला नेसवून टाक म्हणजे झाले." स्वप्नावस्थेतच मी देवीने दर्शन केलेल्या स्त्रीकडे बघितले. ती विदेही होती. अंगावर काही एक वस्त्र नव्हते. तिच्या हसतमुख चेहऱ्यावर ममतेचे तेज खिळलेले होते. मजकडे पाहून ती खदखदा हसत होती. म्हणतात पहाटेचा दृष्टांत खरा असतो. परंतु मला हे कोडे काही समजले नाही. अहो, मी काही फार मोठा भक्त नसून मला देवीची पूजाअर्चा सुद्धा माहित नाही – ख्यावे प्यावे ल्यावे ! जमाखर्च साईबाबांचा नावे अशी माझी भावना व विचारसरणी. श्रीमहालक्ष्मी देवीने स्वप्न दिले हे माझे भाग्य व ही त्यांचीच कृपा. परंतु तिने दर्शविलेल्या विदेही स्त्रीस मी पूर्वी कधीही पाहिले नव्हते. घरातील एक दोन व्यक्तींना मी ही गोष्ट स्पष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्यांनी मला मूर्खातच काढले. झाले, पुढील एक दोन दिवसात ही गोष्ट मी पार विसरलो. पुढे महिन्याभरातच योगायोग आला व काही मित्र मंडळींच्या आग्रहास्तव आम्ही श्रीक्षेत्र पारडशिंग्याला श्रीसती अनसूयामातेच्या दर्शनाला गेलो.

अहो जाणार कसा नाही ! कोणी म्हणे तिला तेथूनच सर्व काही दिसते. ती सर्वांच्या इच्छित मनोकामना पूर्ण करते. सर्व बाधा दूर करते. सर्व संकटांचे निवारण करते. सर्वांना त्यांच्या आचारा विचारासहित ओळखते. अशा तिच्या एक ना अनेक गोष्टी माझ्या कानावर आलेल्या होत्या. देणारा दाता पुढे साक्षात् उभा असताना हात पसरविण्यास कसली लाज ?

परंतु आश्चर्य ! तीच स्वप्नात आलेली विदेही स्त्री श्रीक्षेत्र पारडशिंग्याच्या मंदिरातील गादीवर विराजमान होती व मजकडे पाहून खदखदा हसत होती. मी स्तंभितच झालो. माझे पाय जमिनीला चिकटले. कसातरी हार तिच्या गळ्यात घालण्यास हात पुढे केले. परंतु हार टाकण्यापूर्वीच तिने तो चुरमडून दिस्कळीत केला. श्रीमाता मजवर रागावली. माझे मन ग्लानीने भारले गेले. गळा दाटून आला. मी आपली एक चूक समजून गेलो; व मंदिराच्या एका कोपऱ्यात उभा राहून मनातून तिची क्षमायाचना केली की, माते मी परकर आणला नाही, व कदाचित या खेडेगावात तो मिळणारही नाही. मिळाला तरी

माझ्या खिशात मोजकेच पैसे. पुढील दर्शनाला येताना श्रीकोराडी देवतेने म्हटल्याप्रमाणे मी परकर अवश्य घेऊन येईन. क्षमा कर माते. कातावू नकोस. आई कधी मुलावर रुसते कां? कधीच नाही. रुसते ते मुल. कधीही रुसत नाही ती माऊली." माझ्या मनात श्री साईबाबांची आठवण आली. लगेच श्रीसती अनसूयामातेने इशारा केला व आनंदाने माझी पूजा स्वीकारली. तोच विस्कळीत केलेला हार आपल्या गळ्यात तिने प्रेमाने घालून घेतला, व मला कितीतरी वेळपर्यंत "साईराम '' साईराम" म्हणावयास लावले. स्वतःच नारळ फोडून एक नाहीं दोनवेळा प्रसाद दिला. आम्ही सुखरूपपणे परतलो.

माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. मागील पंधरा दिवसांपूर्वीचे घटना-चक्र आठवले. मी नेलेला हार श्री संत गुलाबबाबांनी स्वतः न स्विकारता तो त्यांनी आपल्या वरील बाजूस लटकविलेल्या याच श्रीमातेच्या फोटोस घाल-ण्याची दुसऱ्या एका इसमास आज्ञा दिली होती. श्रीसंत गुलाबबाबा स्वतः या श्रीसती अनुसया मातेस 'आई' म्हणतात व अधूनमधून श्रीमातेच्या दर्शना-साठी श्रीक्षेत्र पारडशिंग्याला जात असतात, हे सर्वत्र विदीत आहे. परंतु निदान मला तरी त्यावेळेस या विषयी काहीच माहिती नव्हती. मी त्या श्रीमातेच्या फोटोकडे पाहण्याचेसुद्धा श्रम घेतले नव्हते. तरी श्रीमातेस मला आपल्याकडे बोलवावयाचे होते. म्हणूनच श्री. कोराडी देवतेच्या मार्फत ती स्वप्नात येऊन मजपुढे उभी झाली होती. मजकडे पाहून खिदखिदी हासत होती. आता तिला पुढील खेपेस परकर नेणे मला भाग होते.

पुढील नवरात्रास १९ दिवस असतील नसतील तोच श्रीक्षेत्र कोराडीचे श्री महालक्ष्मीचे दैवत उंच धिप्पाड व क्रोध स्वरूपात माझ्या स्वप्नात उभे राहून उद्‌गारले; "याद रख ! तूने मुझे पहनाया नहीं । आठ दिनके अंदर मेरी मंगनी पुरी कर वरना अपनी माँको संभाल लेना।" मी खडबडतच जागा झालो. माझे पूर्ण शरीर घामाने ओलेचिंब झालेले होते. दृष्टी वळवून बघितले माझी मातोश्री जवळच पलंगावर गाढ निद्रावस्थेत होती. माझी झोप पार उडाली. नंतर मी झोपलोच नाही. मनात नाना प्रकारचे विकल्प व शंका कुशंका आल्या. विचारचक्र सारखेच सुरू होते. सकाळ झाल्यावर तावडतोब मी माझ्या मातोश्रींना काही एक न कळविता वर्मताई मिसेस कविता साहू कडे लगेच बोलावणे पाठविले व एकंदरीत तिला सर्व माहिती दिली. तिचा दैविक शक्तिवर अती विश्वास असल्याकारणाने तिने तरी मला मूर्खात गणले नाही. हेच माझे भाग्य म्हणावे लागेल. तिच्याच मार्गदर्शनाने व प्रयत्नाने आम्ही नंतर चार दिवसातच मातोश्रींना काही एक न कळविता श्री सती अनुसया मातेस परकर नेसवून आलो. त्यानंतर अद्याप श्री महालक्ष्मी मातेने व श्रीसती अनुसया मातेने मला कोणतेही दृष्टांत दिले नाहीं.



श्री महालक्ष्मी
कांगडी

वर नमूद केलेल्या पुस्तकात उद्घोषित केलेली श्रीसाईबाबांची श्रीसती अनुसया मातेशी असणारी एकरूपता तिच्या अनेक आचरणांपैकी काही क्षुल्लक उदाहरणावरून पाठकगणास स्पष्ट व्हावी म्हणून मी माझे काही अनुभव स्पष्टीकरणार्थ खाली दिलेले आहेत.

आपल्या अनेक धर्मग्रंथात पुराणात ही गोष्ट निर्विवाद मानली गेलेली आहे की ईश्वर किंवा देवी वारंवार या पृथ्वीतलावर मानवांच्या कल्याणासाठी मानव देह धारण करून वावरत असतात. परंतु म्हणतात ना,

"बिजमें जिमी वृक्ष है। पर प्रकट दिखलाता नहीं !
है इसी विधी ब्रम्हव्यापक, किंतु दरसाता नहीं ।।"

याचा अर्थ असा की बि-बियाणातसुद्धा संपूर्ण वृक्ष (फांद्या, पाने व फुले हे सर्व) असतानाही जोपर्यंत ते सुपिक जमिनीत पेरून उगवत नाही तोपर्यंत आपणास त्या सुप्तावस्थेत असणारा वृक्ष दृष्टिगोचर होत नाही. त्याचप्रमाणे मोह, माया, लोभ, इत्यादि षडरिपुंच्या आवरणाने आपण झाकले गेलेलो आहोत. जोपर्यंत आपण हे आवरण त्यागित नाही तोपर्यंत आपल्यासमोर प्रत्यक्ष उभा असलेल्या ईश्वरास सुद्धा पाहू शकत नाही.

अर्थातच बीज पेरण्याना योग्य व सुपिक जमिन मिळाली नाही. ही सुपीक जमिन मिळवून देण्याचे काम आपला सद्गुरू करीतो, आपली माऊली श्री साईबाबा करिते व आपल्या संयमित भक्तांनाच वियाल असलेले वृक्ष दाखवून देते. अर्थात सद्गुरुच योग्य भक्तांच्या षडरिपूंचा नाश करून ईश्वर कसा आहे हे दाखविते. मला म्हणावयाचे इतकेच की श्री शिवरामसिंह ठाकूर द्वारे अनुवादीत श्री. नरसिंहस्वामीकृत पुस्तकात ज्या श्री सती अनुसया मातेचा श्री साईबाबांशी एकरूपतेचा उल्लेख केलेला आहे तिच श्री सती अनुसयामाता हल्ली श्रीक्षेत्र पारडशिंग्यात वावरत नसेल असे तरी म्हणता येत नाहीं. म्हणूनच की काय तिने मजद्वारे "साईराम" "साईराम"चे उच्चारण करवून त्यांचेशी असणारी एकरूपतेची प्रचिती घडविली, व हे विचार आपल्यासमोर मांडण्यास प्रेरित केले. "श्री दुर्गा सप्तशती" ग्रंथात ही गोष्ट स्पष्ट केली गेलेलीच आहे ;

या देवी सर्वभूतेषु बुद्धिरूपेण संस्थिता
नमस्तस्यै ।। नमस्तस्यै ।। नमस्तस्यै नमो नमः ।।१९।।
(अध्याय ५)

इन्द्रियाणामधिष्ठात्री भूतानां चाखिलेषु या ।
भूतेषु सततं तस्यै व्याप्तिदेव्यै नमो नम : ॥७७॥
चितिरूपेण या कृत्स्नमेतद्व्याप्य स्थिता जगत
नमस्तस्यै ॥७८॥ नमस्तस्यै ॥७९॥ नमस्तस्यै नमो नम : ॥८०॥
(अध्याय ५)

जीवनात ठोकर बसल्याशिवाय परमेश्वर काही आठवत नाही. काही विश्वासू असतात तर अनेक मोह मायेच्या आवरणात गुरफटलेले असतात. अशा व्यक्तींना देवावर विश्वास नसल्याकारणाने ते अशा विभूतींना देखिल 'वेडयातच' गणतात. हा त्यांचा दोष नसून त्यांच्या प्रारब्धाचा आहे. श्रीसाईबाबा हयात असताना कितीतरी जनसमुदायाने त्यांना "पागल फकीर" म्हटलेले होते हे आपणास माहितच आहे. परंतू त्यांना याचे काहीच वाटत नाही. ते आपल्यातच गुंग असतात. उलट हेच अविश्वासू लोक श्रद्धाळू भक्तजनात परीवर्तित झाल्याचे एकनानेक उदाहरणे आपणास 'श्रीसाई सत् चरित्रात" आढळतात. असेच श्रीसती अनुसया मातेचेही आहे. या कलीयुगात चमत्काराशिवाय नमस्कार नाहीच. परिणामस्वरूप ज्यांना ज्यांना श्रीसती अनुसयामातेबद्दल चमत्कार घडलेले आहेत असे अनेक श्रद्धाळू भक्तगण दूर दूरून येत असतात व दर्शन आशिर्वाद घेऊन कृतार्थ होतात. मुंबईचेसुद्धा काही भक्त तेथून इतक्या दूरवर स्थित असणाऱ्या श्रीक्षेत्र पारडशिंग्याला आलेले मी स्वतः बघितलेले आहेत.

ज्याप्रमाणे श्रीसाईबाबा द्वारकामाईत हंडी शिजविताना स्वतःचे हात घालून अन्न कालवित त्याचप्रमाणे श्रीसती अनुसया मातेला मंदिरासमोरील हॉटेलांत उकळत्या तुपातून पूर्ण हाताचा पंजा टाकून हसत हसतच जिलेबी काढून खाताना मी पाहिलेले आहे.


श्री सती अनुसया माता

श्रीसती मातेबद्दल एक विशेष प्रकरण माझ्या ऐकण्यात आहे की ज्या कोणत्याही दुकानात जाऊन ती जी कोणती वस्तू वा जिन्नस मागते ती लगेच दोन–चार तासातच विक्री होऊन संपते.

श्रीमातेच्या दर्शनार्थ आलेल्या दारिद्राने त्रस्त झालेल्या एका वृद्धेने तिच्या करिता फक्त हिरव्या काचेच्या बांगडया श्रद्धेने व भक्तिभावाने आणलेल्या होत्या. श्रीमातेने तिला काय काय आणलेस म्हणून विचारले असता तिने आपल्या दारिद्र्याचे रडणे रडून "आणलेल्या बांगडयाच गोड करून घे" असे म्हटले.

चमत्कार असा की श्रीसती मातेने पाहता पाहताच त्या वांगड्या कुट्टुर कुट्टुर चाऊन खाल्या व तिला आशीर्वाद दिला. सध्या ती वृद्धा सुखाने नांदत आहे.

कोणताही भक्त तिथे दर्शनार्थ गेल्यास श्रीसती माता त्याला "का—का " जेवलास" म्हणून सतत कित्येक तरीवेळा एकसारखी विचारीत असते. माझ्या अल्पबुद्धिनुसार विचार केल्यावर मी तिच्या या शब्दांचा अर्थ असा काढला आहे की,

> "हे मानवा। या देहरूपी जिवनात तू काय काय केलेस. चांगले चांगले उत्तम पदार्थांच्या सेवनाची तुला जितकी गोडी आहे तितकीच ईश्वराच्या नामस्मरणाची आहे काय ? अरे आता तरी लक्ष दे. या षडरिपूंपासून दूर राहण्याचा तू प्रयत्न कर. हे लोभी मन तुला फसवू पाहात आहे. त्याला बळी पडू नकोस. मोहपाशात गुरफटून तू आपल्या इच्छेपूर्तीसाठी इथे आलास. जा, तुझी ही इच्छा तर मी पूर्ण करते. परंतू लक्षात ठेव, जोपर्यंत तुला या सांसारिक पदार्थांच्या प्राप्तीची अभिलाषा आहे तोपर्यंत तू कधीही पूर्ण सुखी राहणार नाहीस. जशीजशी तुझी इच्छापूर्ति होईल तसतशी तिच्या पूर्तीचा लोभ वाढतच राहणार. त्याला शेवटच नाही. आणि जितकी अभिलाषा वाढते तितकेच दुःख वाढते. तुझ्या जिव्हेला दोन प्रकारचे गुण आहेत. स्वाद व बोलणे. हे मानवा, तू स्वादाच्या आसक्तीतच गुरफटू नकोस. जिवन क्षणभंगूर आहे. तुझे बोलणेसुद्धा नेमकेच पाहिजे. यथोचित व प्रेमळपणाने मोजक्या शब्दात ते तू कर व जास्तीत जास्त वेळ सर्वशक्तिमान ईश्वराच्या नामस्मरणात गमव. हेच परमार्थ प्राप्तीचे सोपे साधन जाण. फक्त विषयानाच भोगीत बसू नकोस."

म्हणूनच की काय श्रीसती माता वारंवार आठवण करीत असते,

"का—का " जेवलास?"

म्हणजे थोडक्यात "कोणकोणत्या विषयांचे तू रसस्वादन केलेस असे या ओळींच्या लेखकांचे विचार आहेत. अशा विचारांना मान्यता देण्यास वा न देण्यास पाठकगण पूर्णपणे स्वतंत्र आहेत. कोणीही आपले हृदय भंग होऊ देऊ नये; व झाल्यास लेखक क्षमाप्रार्थी आहे.

ज्याप्रमाणे श्रीसाईबाबांचे जाणे येणे व बसणे काही विशिष्ट स्थळी होत असे त्याचप्रमाणे श्रीसती मातेचेसुद्धा आहे.

श्री साईबाबा वर्षातून एकदा तरी नामसप्ताह साजरा करीत. तसेच श्री अनुसयामातेच्या श्रीक्षेत्र पारडशिंग्याला दरवर्षी मे महिन्याच्या प्रथम आठवड्यात

नामसप्ताह साजरा करण्यात येतो. विशेष हें कीं श्रीसंतश्रेष्ठ पुंडलीक महाराजांनी (मूर्तिजापूर) व श्री संत गुलाबबाबांनी (काटोल) स्वतः हजर राहून असला नामसप्ताह पाळण्याचा शुभारंभ केला. मला तरी वाटते, त्याकाळी सुद्धा श्रीक्षेत्र शिर्डीच्या लहानसहान परिसरात अशीच जत्रा भरत असावी. या घटनेनंतर लोकाना कळून चुकले की ही गावात वावरणारी, वेडी, विदेही, काहीतरी बडबडणारी व शिव्यागाळीची लाखोली वाहणारी स्त्री "पागल" नसून कोणी तरी दैविक विभूती आहे. शक्ती स्वरूपा आहे.

पुढे काही चमत्कार दृष्टीस आल्यावर आतातर त्या गावातील लोकानीच एक लहानसे व आकर्षक मंदीर उभारले असून पलंग-बिछाना इत्यादींची व्यवस्था करून श्रीसतीमातेस त्यावर बसविले आहे. नियमितपणे सकाळ-सायंकाळी आरती व पूजा-पाठ नगारे, शंखाच्या मंगल ध्वनित पार पाडण्यात येतो. वातावरण श्रीक्षेत्र शिर्डी सारखेच मतीगुंग करणारे असते. रोज पहाटेस पवित्र मन्त्रोच्चार विधी वगैरे नियमितपणे होत असतो. दोन रक्षक श्रीसती मातेच्या सोबत नेहमी आढळतात. श्रीक्षेत्र पारडशिंग्याला हल्ली संस्थान स्थापित झालेले असून गावातील मंडळी श्रीसतीमातेस गावाच्या सीमेबाहेर जास्त कधी जाऊ देत नाहीत. परंतु अनेक व्यक्ती ज्यांना श्री सतीमातेवर श्रद्धा व विश्वास नाही कुजबुजताना अद्यापही आढळतात.

श्रीसतीमाता पलंगावर बसलेली असते व अनेक कुत्रें कुत्री यांच्याशी बागडत असतात. एखादा खांद्यावर तर दुसरा शरीरावर तर तिसरा पायाशीं व ती त्यांना फार प्रेमाने कुरवाळीत असते. जागतिक व्यवहाराशी काही संबंध नसणारी – अगदी दूर – स्वतःतच विसरलेली – कधी गंभीर विचारात तर कधी स्मित करीत तर कधी क्रोधात व कधी ममतेच्या वात्सल्य तेजाने आच्छादित असणारी तीची मुखमुद्रा. वेगवेगळ्या भक्तांसमोर श्री सतीमातेचे वरील सर्व हावभाव व निरनिराळे व्यवहार पाठकाना कधीही पहील्याच दर्शनाला दिसून पडतील. कधी श्रीमातेला बदाम हवेत तर कधी खारका, तर कधी नारळ हवा. परंतु बहुधा ती झुणका–भाकरी मोठ्या आनंदाने स्वीकारते. स्वतः मोजकेच ग्रास ग्रहण करणारी श्रीमाता कुत्र्यांना अधिकाधिक टाकीत असते. ओटी भरताना दिलेल्या आरशात स्वतःला कितीतरी वेळ एकसारखी न्याहाळत बसते. अनेकदा डोळ्यासमोर बांगडी धरून एकटक पहात जणूकाही येणाऱ्या भक्ताची सूक्ष्मरितीने कसोटी घेत असते. व तिच्या श्रीमुखांतून गाण्याचे मधूर स्वर निघत असतात. या गाण्यातच दर्शनार्थ येणाऱ्या भक्तांचे भूत-भविष्य-वर्तमान सगळेच काही सामावलेले असते. या गाण्यांचा गूढार्थ समज-

ण्याला अक्कल खर्चावी लागते. नाहीतर कोणी ना कोणी तरी समजवणारा श्रीमातेच्या कृपेने भेटूनच जातो.

सकाळी अंदाजे ९–१० वाजता काही ठराविक दुकानासमोर हात पसरवून श्री सतीमाता भिक्षा मागताना दिसते. संध्याकाळी ५–६ च्या दरम्यान तिची बैठक नित्य नेमाने एका विशिष्ट किराणा-दुकानात असते. त्या दुकानदाराने तिच्यासाठी एक बैठकच वेगळी सुसज्जित केलेली आहे. गावातील काही मंडळी त्या दुकानदाराच्या भाग्यास मत्सररूपी द्वेषभावाने बघतात. कारण त्याचेच दुकान फार चालते. पूर्वी ते दुकान कोणा दुसऱ्या एका इसमाच्या मालकीचे होते. परंतु विक्रीअभावी त्याने ते विकले व ज्याने ते खरेदी केले त्याच्याच प्रारब्धानुसार व पूर्वजन्माच्या पुण्याईनेच कदाचित श्रीमातेस तिथे नियमित बसणे भाग पाडले असावे. त्या न चालणाऱ्या दुकानास आज उत्कर्षाचे दिवस आले आहेत.

वाचकहो ! आपण माझ्या या लिखाणाने त्रस्त तर झाले नाहीत ना ? थकवा आला असेल कदाचित. अहो, हा तर तोच श्रीसतीमातेद्वारे विसकळीत केलेला हार आहे जो उकलविण्याचा व तिच्या गळयात घालण्याचा मी प्रयत्न करीत आहे. ही शब्दरूपी माळसुद्धा ती स्वीकारेल किंवा नाही ? अशी मनात धास्ती उत्पन्न झाली आहे. तरीपण प्रयत्न करणे माझे कर्तव्य आहे.

पुढे थोडक्यात आपल्या मित्रमंडळींच्या अनेक अनुभवापैकी काही विशिष्ट अनुभव निवेदित करण्याच्या स्फूर्तीला श्रीसाईबाबांनी व श्रीमातेने आज्ञा दिली आहे व तिनेच जणूकाही माझ्यात प्रवेश करून पुढील लिखाणास प्रवृत्त केले असावे असे वाटते.

मागे नमूद केल्याप्रमाणे जेव्हा मी परकर व ओटी भरण्याचे साहित्य घेऊन श्री सतीमातेच्या दर्शनार्थ गेलो तेव्हा श्री माता मला उद्देशून म्हणते :–

"सामग्री आणलीस कोठऊनी
वास येतो आहे मुड्यांचा ।
उभा असे फकीर अवलोया
पांढरी दाढी-मिशी लांब ।
मेहेरबानी असे त्याची
उणीव भासत नाहीं कशाची ।
बरी येत आहेत मुडदे
पकताहेस मिसी ऽ जवळ ।
पण मरत नाही मुडदे
उठूनी उभे राहतात !"

व आशिर्वादास्तव डोक्यावर हात ठेवून म्हणाली :– "जा ! मुडदेसुद्धा उठून उभे राहतील।" पाठकगण, योग्य तो निष्कर्ष काढण्यास मोकळे आहेत. पण एक गोष्ट लक्ष देण्यासारखी आहे व ती मी आपणापासून लपवू इच्छित नाहीं. वरील घटनेनंतर माझ्या हातास अपरिमित यश लाभलेले आहे. रोग्यांची योग्य सेवा सुश्रूषा करण्यास मला त्याचा फार उपयोग होत आहे. मला स्वत:-बद्दल काहींएक म्हणायचे नसून फक्त प्रचिती दाखवावयाची आहे श्री. मातेने दिलेल्या सात्विक आशिर्वादाच्या खरेपणाबद्दल.

माझ्या सोबत सरकारी नोकरीवर असणारी एक व्यक्ती, श्री कृष्णराव घाटोळे, सुद्धा दर्शनार्थ आलेली होती.

त्यास उद्देशून श्रीसतीमाता म्हणाली :—

"आहे गुणी हा फार
लग्नाची हवस ही फार ।
निराश झाला का रे सोनोल्या
धैर्य सोडू ” नकोस !
वेळ आहे अजऊनी
दोन वरीष तरी ऽ ।
घोड्यावर येईल वरात
होईल श्रीमंताचा जावई ।"

आणि खरोखरच त्याचे लग्न, जवळजवळ दोन वर्षांनी मागील महिन्यातच पार पडले. आज तो 'कृष्णाचा' कृष्णराव होऊन एका धनाढ्य इसमाचा जावई झालेला आहे. सध्याच तो आपल्या पत्नीसोबत आशिर्वादास्तव पारडशिंगाला गेला असताना श्रीसतीमातेने ४० रुपयांची गोष्टसुद्धा काढली ज्याबद्दल त्या जोडप्यात घरून निघताना वादविवाद झालेला होता.

आमची धर्मताई सौ. साहू एका उच्चमाध्यमिक शाळेत शिक्षिका आहे. मुख्याध्यापिकेचे स्थान तिला मिळण्यासारखे असून त्याबाबत तिची धडपड सुद्धा सुरू आहे. तिला उद्देशून श्रीमाता म्हणाली होती :—

"भाकर खाल्ली अनेकदा
मन झाले असे तृप्त ।
आता हवी पुरण पोळी
घेऊनी ये तू बये ।
घर आहे नाजूक
भिंती सडून गेल्यात ।
वादळ पाऊस येईल

भिंत कोसळून पडेल ।
नको घाबरू ग बये
नवी उभारावी लागेल ।"

खरोखरच त्यांच्या येथील एकीकडील भिंत पाऊसाने पडली. विशेष हे की ती सर्व जागा त्यांनी खरेदी करून स्वतःचे सिमेंटचे नवीन पक्के घर बांधण्याचे काम सुरू केले आहे. नोकरीत बढती विषयीची केस हायकोर्टात असून अद्याप निकाल व्हावयाचा आहे. तरी "हवी पुरण-पोळी" म्हणजे काम पूर्ण होईल व मुख्याध्यापिकेची जागा सौ. ताईस मिळेल. असे मला तरी वाटते.

श्री. चंद्रशेखर वन्हाडपांडे हे सध्या नागपूर नभोवाणीवर अनाउन्सर असून श्रीसंत गजानन महाराजांचे ते निष्ठावान भक्त आहेत. त्यांनी "श्री गीत गजानन" रचलेले असून त्यांचयातील पाच अध्यायांचे पारायण ते नियमितपणे कुणीही आमंत्रित केले असता निःशुल्क करतात. फार मोठा जनसमुदाय त्यांचे "श्री गीत गजानन" सुमधूर गोड व आकर्षक आवाजात ऐकण्यास गोळा होत असतो. श्रीगजानन महाराजांविषयी त्यांचे अनेक अनुभव असून या श्री सती अनुसया मातेबद्दलही त्यांना प्रचिती आलेली आहे. "श्रीगीत गजानन" सोबतच ते या मातेचा प्रचार करीत असतात. ते सांगतात की :—

एकदा ते काहीं मित्रमंडळी सोबत त्यांच्या अनुग्रहास्तव पारडशिंग्याला श्रीमातेच्या दर्शनार्थ गेले असताना ती त्यांना म्हणाली. "लेका ! हा चोंलना (फुलप्यांट) घालून कशाला आलास रे ? मी काय काही दूसरी व्हय । श्री महाराजांची पूजा-अर्चा तर तू सोहळा नेसून करतोस रे मग माझ्याच पुजेला हा चोलना नेसलास ! जा लेका मरशील ‥ ।"

श्री. वन्हाडपांडेंची घाबरून त्रेधाच उडाली.

थोडावेळ थांबून श्रीमाता म्हणाली :—

"बरं घाबरू नकोस । मरणार नाहीं, तू नाही तो मरेल जा । मी आहेच की इथें !"

आशिर्वाद घेऊन वन्हाडपांडे सर्वांसोबत परतले. पारडशिंगा ते काटोल च्या दरम्यान मध्य रस्त्यावर अंदाजे २० फूट लांब एक फार मोठा सर्प मार्ग अडवून फुंकारीत असलेला त्यांना दिसला. थोडया अलीकडेच ड्रायव्हरने टेंपो थांबविली. सर्व मंडळी घाबरून घामाने ओलोचिंब झाली. तितक्यातच मागून भरवेगाने आलेली ट्रक त्या सर्पावरून निघून गेली. "तू नाहीं तो मरेल" अर्थात सर्प मेला व हे सुखरूपपणे परतले. अद्यापही तो अविस्मरणीय प्रसंग आपल्या "गीत गजानन" मध्ये ते रंगवून सांगत असतात.

मी सुद्धा नागपूरास परत येताना तेथील एका गावकरी मित्राने तोडून दिलेले वांगे माझ्या पिशवीत ठेवून घेतलेले होते. मी मंदिरात पोहचलो असताना श्रीमाता म्हणाली होती :–

"निर्दयी कितीरे आहेस
वांगे तोडीले रे कोवळें ।
दुःखविलेस रे त्यांना
रक्त वहात आहे ।"

त्यांना लांबवर स्थित असणाऱ्या मित्राच्या घरातील ही घटना कशी काय समजली ? आणि भविष्यात पहा प्रकार असा घडला की, चाळीसगावचे संत श्री. बापजी महाराजांनी (साईलीला मराठी जून ७५ व साईलीला इंग्रजी सप्टेंबर ७५) माझे वांगे खाणे कायमचे बंद केले. व सध्या माझे वाढलेले रक्तचाप एकदम नॉर्मल झाले आहे. वैज्ञानिकदृष्टया वांग्याचा व रक्तचापाचा मुळीच संबंध नाहीं. घटना घडली पारडशिंगधास आणि तिचा निकाल लागला चाळीसगावात.

वाचकहो ! मागील पूर्ण प्रकरणांबाबत विचार केल्यास खालील प्रश्न उद्‌भवतात.

(१) श्रीसती मातेविषयी परिचय करवून देण्यास कोराडीचे श्रीदैवत का माझ्या स्वप्नात आले ?

(२) श्रीसंत गुलाबबाबांनी नेमका माझाच हार स्वतः न स्वीकारता कां तो दुसऱ्याकरवी श्रीसतीमातेच्या फोटोस अर्पित केला ?

(३) श्री सतीमातेने का मला "साईराम – साईराम ..." म्हणावयास लावले ?

(४) श्री सतीमातेने वांग्याबद्दल काढलेले उद्गार कसे काय श्रीसंत बापजी महाराजांना चाळीसगावला कळले ? व पुढे का ते न खाण्याची मला सक्त ताकीद दिली ?

विशेष हे की श्री सतीमाता कधीही येथून १०–२० मैलाच्या सीमेबाहेर कधीच गेलेली नाहीं.

वरील प्रश्नावरून स्पष्ट होते कीं या सर्वामागे कोणत्या न कोणत्या प्रकारची बिनतारी – संदेश – वाहक – यांत्रिक – योजना (Wireless syst-m) काम करीत असते हे निश्चित, व ती कशी काय काम करते ते आपण पामरांच्या बुद्धीच्या बाहेरची गोष्ट आहे. आपण कधीही ते समजू शकत नाहीत. विज्ञानाने कितीजरी प्रगती केलेली असली तरी याचा उलगडा करणे त्याच्या आटोक्याच्या बाहेर आहे. हे जरीसुद्धा

एक 'पवित्र–विज्ञान' असले तरी अलीकडच्या विज्ञानापेक्षा त्याचे क्षेत्र फार मोठे आहे. ते मानवाच्या बुद्धीस कधीच समजू शकणार नाही हे निश्चित. आपण फक्त वरील अनुभवावरून व ऐकलेल्या अनेक सत्यगोष्टीवरून एकच धडा घेऊ शकतो आणि तो हा की, "जास्त वादविवादात न पडता फक्त दृढ विश्वास ठेवणे." व ते सुद्धा जमत नसल्यास गप्प राहणे. ईश्वरी अंश सर्व प्राणिमात्रात व्याप्त आहे. त्याची टिंगल उडविण्याची धास्ती कोणी कधीही करू नये.

श्रीमाता माताच राहणार
मुल मूलच राहणार.
तिच्या अधिकाराची सर मुलाला कधीही येणार नाही.

# श्री. नागेशराव आ. सावंत यांचे दुःखद निधन



**श्री. नागेशराव सावंत**

श्रीसाईलीला मासिकाचे सुरवातीचे संपादक, श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डीच्या कार्यकारिणीचे जुने विश्वस्त श्री. नागेश आत्माराम सावंत यांचे गुरुवार दि. ८ जानेवारी रोजी नागपूर येथे दुःखद निधन झाले. गेले कित्येक महिने त्यांचे वास्तव्य शिर्डी क्षेत्रीच होते. त्यांची प्रकृति ठीक नव्हती म्हणून एका सज्जनाने त्यांना श्रीबाबांच्या पुनीत सहवासात येऊन रहाण्याचा सल्ला दिला होता. शिर्डीस त्यांची प्रकृति ठीक होती परंतु गेल्या डिसेंबरात ते आपल्या चिरंजीवांकडे गेले होते. १५ डिसें. ७५ रोजी ते स्नानगृहात पडले, लगेच त्यांना तेथल्या एका खाजगी इस्पितळात दाखल केले, परंतु दुर्दैवाने ते या दुखण्यातून बरे होऊ शकले नाहीत, त्यातच त्यांचे देहावसान झाले. निधनसमयी त्यांचे वय ८१ वर्षांचे होते. स्वभावाने ते निगर्वी अन् मनमिळावू वृत्तीचे होते. त्यांच्या निधनाने एक जुना साईभक्त साईचरणी विलीन झाला आहे. आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. ईश्वर मृतात्मांस सद्गति देवो. (श्री. सावंत यांचा परिचय श्रीसाईलीलेच्या जुलै १९७५ चे अंकात प्रसिद्ध झालेला आहे.)

# साईभक्त श्री. रघुनाथराव सांडभोर

• साईनंद



पुण्यात दत्तवाडी विभागात श्री. रघुनाथराव सांडभोर या नावाची सडपातळ व्यक्ती साईभक्त म्हणून ओळखली जाते. तर शिर्डीस हे सांडभोर-काका एक उत्कृष्ट हातवारे करणारे कल्पक नट म्हणून ओळखले जातात. वर्षभरात शिर्डीला जे उत्सव होतात त्याप्रसंगी सांडभोरकाका हजर राहतात. रात्री बाबांची गावातून पालखी फिरविली जाते; मोठी जंगी मिरवणूक निघते व मध्यरात्रीच्या सुमारास ही मिरवणुक संस्थानच्या भोजन गृहासमोर आली रे आली की एक बहारदार भारूडाचा कार्यक्रम तिथे होतो. तोबा गर्दी तिथे होतो या कार्यक्रमात प्रामुख्याने भाग घेतलेला असतो श्री. सांडभोरांनी. विशेषत स्त्रीभूमिका ते खूपच चांगली रंगवतात. हसून हसून सगळ्यांची मुरकुंडी वळते. चांगला थाऊण एक तास हा कार्यक्रम रंगतो. सांडभोरांचा मूळ पिंडच नकल्या स्वभावाचा आहे. लहानपणापासूनच त्यांना छोटया छोटया भूमिका करावयाची आवड. स्वयंस्फूर्तीने ते खटकेबाज संवाद आपल्या भूमिकातून म्हणत असतात.

ते मूळ पुण्या जवळच्या खेड तालुक्यातील तिन्हेवाडी या गावचे. तिथे त्यांचा जन्म १८ ऑगस्ट १९२७ रोजी झाला. त्यांचे वडील श्री. बाबूराव एक साधे शेतकरी. रघुनाथरावांच्या मातेश्रींचे नाव यमुनाबाई. त्यांना दोन पुत्र व दोन कन्यका झाल्या. छोटया रघुनाथचे प्रा. शिक्षण सातवीपर्यंत खेड येथे झाले. शिक्षणाच्या निमित्याने दत्तभक्त आईवडीलांनी रघुनाथरावांना खेड येथे श्री. नामदेव महादेव निकम यांचे घरी शिक्षणासाठी ठेवले. ते पोलीस खात्यात होते. ते परम साईभक्त होते तेव्हा त्यांच्या घरी बाबांची पूजा आरती इ. कार्यक्रम रोजच्या रोज होत असत. याचाच परिणाम छोटया रघुनाथवर झाला व त्यांनाही बाबांच्या भक्तीची जी गोडी लागली ती अगदी आजतागायत. एकदा निकमजींच्या घरी त्यांचे गुरु बंधू श्री. नानासाहेब दामोदर रासने भेटण्यासाठी आले व त्यांनी या छोटया मुलाला साईबाबांचे एक चित्र भेटी-दाखल दिले ते त्यांनी अत्यादराने जपून ठेवले. १९४० साली रघुनाथराव निकमजींच्या बरोबर अगदी प्रथम शिर्डीस गेले. तेव्हापासून आजतागायत गेली

३५ वर्षे त्यांची शिर्डी वारी कधी चुकली नाहीं. श्री बाबांच्या बद्दलचे अनेक अनुभव आज त्यांचेकडे आहेत.

१९४३ साली रघुनाथरावांनी भारूडाच्या कार्यक्रमात पहिल्यांदा भाग घेतला. यावेळी त्यांचे कौतुक कै. दासगणूंनी केले. त्यांनी त्यांस नारळ व एक रुपया व शुभ आशिर्वाद दिले ते चांगलेच फळाला आले आहेत असेच म्हणावयास हवे. कारण त्यावर्षापासून ती आजतागायत अखंडितपणे भारूडाचा कार्यक्रमातून सांडभोर उत्कृष्ट वग करीत आले आहेत. त्यामुळे शिर्डीला वेळोवेळी भेट देणारी सारी भक्त मंडळी त्यांना चांगलीच ओळखतात. आपल्या गोड स्वभावाने सांडभोरांनी सर्वच बाबाभक्तांना आपलेसे करून घेतले आहे. काव्याकडे त्यांचा ओढा आहे.

श्री. रघुनाथरावांचा विवाह १९४९ साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. कमलताई या पण साईभक्त आहेत. त्यांना खाण्यासाठी म्हणून कोणताही पदार्थ दिला तर प्रथम त्या बाबांच्या समोर ठेवतात व मगच त्यांना वाटले तर तो पदार्थ सेवन करतात. सांडभोर दांपत्याला चि. दिलीप व सुनील अशी दोन मुले आहेत. त्यांना झालेली एक कन्या कु. रजनी लहानपणीच स्वर्गवासी झाली. आपल्या मुलांच्या शिक्षणकार्यात या सांडभोर दांपत्याचे लक्ष वेधलेले आहे. श्री. रघुनाथरावांनी आपल्या वडीलांच्या १९४३ च्या निधनानंतर अत्यंत बिकट परिस्थितीतून वाटचाल केली. बाबांच्यावर त्यांनी दृढ विश्वास ठेवला व अनेक काट्याकुट्यातून मार्ग आक्रमीत त्यांनी यशस्वीपणे आपला जीवनरथ हाकला. सध्या ते खडकी येथे ॲम्युनेशन फॅक्टरीत नोकरीस असतात. बाबांची सेवा ते अशीच अखंडीतपणे करोत व त्याचप्रमाणे एकनाथी भारूडाच्या कार्यक्रमातून भरपूर मनरंजन प्रत्येक उत्सव प्रसंगी करून भाविकांची व रसिकांची सेवा पण ते करोत अशी शुभेच्छा प्रकट करतो. ●


# श्रीसाईबाबांचे अगदी प्रथमच प्रकाशित होणारे अगदी खरेखुरे छायाचित्र

श्रीसाईलीलेच्या एप्रिल १९७६ मुखपृष्ठावर पहा.

### श्रीसाईलीलतून शंभरावर लेख लिहिणारे

# ठाण्याचे श्रीसाईभक्त—द. शं टिपणीस

– सदानंद चेंदवणकर



टिपणीस सर हे माझे गुरुजी. परळच्या आर. एम. भट हायस्कूलात शिक्षण घेत असताना इंग्रजी पहिली ते चौथी पर्यंत अंकगणित मला टिपणीस सरांनीच शिकविले. पण सर त्यावेळी साईबाबांचे भक्त आहेत हे मला माहितही नव्हते. पुढे १९६२ साली टिपणीस सरांची गाठभेट शिर्डी येथे पडली त्यावेळी मात्र ते साईप्रेमी असावेत असे मला वाटले. गेल्या दोन वर्षापासून मी जेव्हा श्रीसाईलीलेच्या संपादन कार्यात लक्ष घालू लागलो तेव्हा ओघानेच मागील अंक चाळले. तेव्हा टिपणीस सर हे नुसते साईप्रेमी नसून महान साईभक्त आहेत, साई विषयावर त्यांनी प्रचंड लेखनकार्य केलेले आहे याची साक्ष पटली आणि मग गुरुचरणी मस्तक आणखीनच विनम्र झाले. मी जेव्हा जेव्हा ठाण्याला जातो तेव्हा तेव्हा टिपणीस सरांना भेटतो. त्यांच्या खोलीतील बाबांच्या तसबिरीला वंदन करून उदी लावतो आणि पुनश्च भेटू म्हणून निरोप घेताना त्यांचा आशिर्वाद घेऊन निघतो.

श्रीसाईबाबांच्यावर अखंडीतपणे लेखन करणारे श्री. दत्तात्रय शंकर टिपणीस सर हे ठाण्याचे आहेत. त्यांचा जन्म २३ डिसेंबर १९०३ रोजी मुरबाड जवळील टोकावडे गावी झाला. दत्तात्रेयजी लहान असतानाच म्हणजे त्यांच्या वयाच्या दिडाव्या वर्षी त्यांचे वडील स्वर्गवासी झाले. दत्तात्रयजींच्या मातोश्रींचे नाव पार्वती. त्यांना तीन पुत्ररत्नांची प्राप्ती झाली खरी पण छोट्या दत्तात्रयाचा जन्म झाला नि थोड्याच दिवसात पतीचे देहावसान झाले तेव्हा गजानन, पुरुषोत्तम व दत्तात्रय या तिन्ही मुलांची जबाबदारी त्यांचे पुण्याचे मामा श्री. रामकृष्ण व श्री. पांडुरंग जकातदार यांनी घेतली.

छोट्या दत्तात्रयांचे प्राथमिक शिक्षण पुण्यास व दुय्यम शिक्षण ठाण्यास झाले. १९२३ साली ते मुंबई विद्यापीठाची मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाले; व लगेच स्वावलंबी जीवन कंठण्याचा त्यांनी निर्धार केला. मुंबईतल्या भोईवाडा विभागातल्या "डिप्रेस्ड क्लास मिशन सोसायटी"च्या शाळेत शिक्षक म्हणून

त्यांनी प्रवेश केला. तिथे त्यांनी वर्षभर नोकरी केली. १९२६ साली त्यांनी परळच्या गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आर. एम. भट हायस्कूलात शिक्षक म्हणून नोकरी पत्करली व तिथे इमाने इतबारे चांगली ३६ वर्षे नोकरी करून ते १९६२ साली सेवानिवृत्त झाले. त्यांनी केलेल्या ज्ञानदान कार्याबद्दलचा गौरव भट हायस्कूलचे प्राचार्य कै. मो. बा. दोंदे यांनी केला होता. श्री. टिपणीस उत्तम प्रकारचे नाटककार आहेत. मुलांसाठी त्यांनी काही नाटके लिहिली आहेत.

श्री. टिपणीस यांचा विवाह १९३२ साली झाला त्यांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या कु. शांता देशमुख. टिपणीस दांपत्यास प्रकाश व दिलीप असे दोन पुत्र असून ते दोघेही सुशिक्षित आहेत. थोरले चि. श्री. प्रकाश हे ठाण्याच्या वागळे इस्टेट-मध्ये प्रेशर कुकर फॅक्टरीत इंजिनियर असून धाकटे चि. दिलीप हे बेलापूर येथे स्टार केमिकल्समध्ये आहेत.

श्री. टिपणीसांची साईभक्ती १९५१ सालापासूनची आहे पण १९५५ साली त्यांच्या सौभाग्यवती खूप आजारी पडल्या त्यातच पाठीच्या कण्याचे त्यांचे दुखणेही बळावले. त्यावेळी त्यांनी बाबांची मनोभावे करुणा भाकली, व पत्नीला दुखण्यातून बरे करण्याची प्रार्थना केली. बाबांनी आपल्या निस्सीम भक्ताची ती प्रार्थना ऐकली. पुढे लौकरच सौ. प्रमिलावहिनी दुखण्यातून बऱ्या झाल्या. आपल्या पतीप्रमाणेच त्यापण बाबांची निष्ठेने भक्ती करतात. श्री. द. शं. टिपणीसांचा श्रीसाईलीलेत पहिला लेख फेब्रुवारी १९६० साली प्रसिद्ध झाला त्या लेखाचे शीर्षक होते. "श्रीस्वामी विवेकानंद व शिरडीचे श्रीसाईबाबा." श्री. द. पां. खांबेटे त्याकाळी श्रीसाईलीलेचे संपादक होते. साठ सालापासून तो आजतागायत श्री. टिपणीस साहेब श्रीसाईलीलेतून श्रीसाईबाबा व अध्यात्मिक विषयांवर लेखन कार्य करीत आहेत. एकावेळी ते दर वर्षीच नव्हे तर मनात आले रे आले की शिर्डीस भेट देत असत व बाबांचे डोळे भरून दर्शन घेत असत. पण आता वृद्धावस्थेमुळे त्यांना शिरडीस जाणे कठीण होते म्हणून आपल्या देवघरातच त्यांनी बाबांची पूजाअर्चा आरंभिलेली आहे. बाबांचे सारे उत्सव ते आपल्या घरीच साजरे करतात पण रामनवमीचा उत्सव मात्र ते पाडव्या पासून दशमीपर्यंत साजरा करतात. शेकडो भाविक या काळात त्यांचे निवासस्थानी तीर्थप्रसादास व दर्शनास येतात. गेली १९ वर्षे ते रामनवमीचा उत्सव साजरा करीत आहेत. अशा या महान साईभक्ताच्या हातून, असेच श्रीसाईविषयावर भरपूर लेखन होवो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

# एक वटवृक्ष उन्मळून पडला !

लेखक :- **डॉ. शांताराम टिपणीस,** साकोरी

१८ ऑक्टोबरचा दिवस उजाडला, आणि साकुरी-आश्रमातील एका निष्ठासंपन्न जीवनाचा अस्त झाला. वर्षानुवर्षे आश्रमाच्या कार्याची धुरा यशस्वीपणे सांभाळणारे आश्रमाचे व्यवस्थापक श्री. भैरवनाथ वाघ तथा वाघमामांची जीवनज्योत कायमची मालवली. संस्थेचा एक आधारस्तंभच कोसळला. अनेकाना सावलीप्रमाण भासणारा एक जुनाट वृक्ष उन्मळून पडला. त्यांच्या निधनाने सारं गाव हळहळलं. आश्रमवासीयांचे तर काळीजच फाटले. सारी जनता शोकसागरात बुडून गेली, आणि सर्वत्र विषण्णतेची दाट छाया पसरली. कुणास काहींच सुचेनासे झाले. सर्वांची मने अगदी सुन्न झाली. कारण, सर्वांचे आवडते वाघमामा त्यांना कायमचे अंतरले होते. वाघमामांची ती धीरगंभीर मूर्ति, प्रसन्न मुद्रा आता फिरून दृष्टीस पडणार नव्हती. त्यांचा पार्थिव देह आता कायमचा दृष्टिआड होणार होता.

या वाघमामांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील लमावण गावी १९०२ मध्ये झाला. आजवर या मुलुखातून डोंगराएवढी माणसं निर्माण झाली. कुठल्या तरी ध्येयाने वेडी झालेली निष्ठावंत, प्रयत्नवादी माणसं येथे जन्मास येऊन अलौकिक कार्य करून गेली. वाघमामा तरी परमेश्वरप्राप्तीच्या वेडाने असेच झपाटले होते. आणि याच वेडापायी त्यांनी ऐन तारुण्यात आपले घरदार सोडले आणि साकुरी-आश्रमाचा आसरा केला, त्यावेळी, मुंबई येथील सेंट झेवियर कॉलेजातून ते पदवी परिक्षा उत्तीर्ण झाले होते, व कायद्याचा अभ्यास त्यांनी चालविला होता, त्याच सुमारास श्री उपासनी महाराजांचा चरित्र-ग्रंथ त्यांच्या वाचनात आला, प्रसिद्ध कादंबरीकार 'नाथमाधव' यांच्या प्रभावी लेखणीतून निर्माण झालेले ते रसाळ चरित्र वाचताच त्यांना श्री महाराजांच्या दर्शनाची ओढ लागली आणि त्या तळमळीनेच त्यांना एक दिवस अनाहूतपणे साकुरीस ओढून नेले. श्रीमहाराज म्हणजे एक लोकोत्तर विभूति होती. पहिल्याच भेटीत त्यांच्या दिव्यत्वाचा वाघमामांना साक्षात्कार घडला आणि त्यांची ती गोणपाटधारी तेजःपुंज मूर्ति त्यांच्या हृत्पटलावर कायमची कोरली गेली. एकदा साकुरीस आल्यावर ते तिथें राहिले ते कायमचेच

आश्रमात राहायचे म्हणजे कष्टाच्या घाण्यास जुंपून घ्यावयाचे त्यातून तो काळ पन्नास वर्षापूर्वीचा होता. आताप्रमाणे त्याकाळी कसल्याच सुखसोयी

नव्हत्या. अडचणी आणि त्रास सोसून राहावे लागे, झाडझूड करणे, गटारे साफ करणे असली कष्टाची कामे ते आवडीने करीत होते, आणि भजन-नामसंकीर्तनादि कार्यक्रमात रमून गेले होते.

त्यावेळी श्री महाराजांच्या कीर्तीची कमान उंचावत चालली होती, आणि आश्रमाचा व्याप झपाट्याने वाढत होता. अशावेळी तो कुशलपणे सांभाळणाऱ्या विश्वासू, प्रामाणिक आणि निष्ठावंत व्यक्तीची फार गरज होती. श्री महाराजांना वाघमामांमध्ये अशी व्यक्ती आढळली, आणि एक दिवस त्यांना बोलावून आश्रमाच्या किल्ल्या त्यांच्या हवाली केल्या. तेव्हापासून व्यवस्थापकाचे काम त्यांच्याकडे आले, आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी ते उत्तमरीतीने आणि यशस्वीरित्या सांभाळले.

वाघमामांनी अधिकाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वी व्यवस्थापकाच्या जागेवर ४–५ तरी व्यक्ति स्थानापन्न होऊन गेल्या. तथापि १।–१॥ वर्षापेक्षा अधिक काळपर्यंत कोणाची कारकीर्द टिकली नाही. आश्रमाचा हा पूर्वेतिहास लक्षात घेता सतत ४५ वर्षे अखंडपणे व्यवस्थापक या नात्याने झालेली त्यांची यशस्वी कारकीर्द त्यांच्या अंगच्या अनेक गुणांचा, त्यांच्या बुद्धिचातुर्याचा, तसेच कुशल नेतृत्वाचा मूर्तिमंत पुरावा आहे. त्यांची शांत, समतोल वृत्ति, कुठलेही काम जातीने करण्याची तयारी आश्रमाचे अंगण झाडण्यापासून कोणतेही जबाबदारीचे काम तितक्याच तन्मयतेने करण्याची त्यांची वृत्ति, आश्रमातील कार्यकर्त्यांची मने न दुखवता त्यांच्याकडून काम करून घेण्याची त्यांची हातोटी यातच त्यांच्या अपूर्व यशाचे रहस्य साठवलेले आहे.

वाघमामा म्हणजे 'साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी यांचे मूर्तिमंत प्रतीक होते. एखादा जुना-पाना सदरा आणि जाडेभरडे धोतर हेच त्यांच्या कायेचे भूषण होते, तत्त्वाआड येणारी कोणतीही गोष्ट ते कटाक्षाने टाळीत. वाघमामा म्हणजे मूर्तिमंत विरक्ती होती. त्यांचे चरित्र घुतल्या तांदळासारखे स्वच्छ आणि निर्लेप होते. त्यांच्यासारखी चारित्र्यसंपन्न माणसं आजच्या समाजात शोधून सापडणे कठीण !

बरेच वर्षापूर्वीचा एक प्रसंग आठवतो मला. एकदा रात्रीचे वेळी आजूबाजूच्या खेड्यातील भिल्लांनी पैशाच्या लोभाने आश्रमातील एका खोलीवर हल्ला केला, भिल्लांच्या हातातील शस्त्रे आणि त्यांचे उग्र चेहरे पाहून खोलीतील मुली भीतीने लटलटा कापू लागल्या. थोडीशी रक्कम हाती पडल्यावर भिल्ल तेथून पसार झाले. पोलिसांकडे वर्दी देताच भिल्लांचा माग काढून त्यांना शिताफीने पकडण्यात आले, व दुसऱ्याच दिवशी सकाळी वाघमामांसमोर उभे

करण्यात आले. भिल्ल अत्यंत गयावया करू लागले. त्यांनी वाघमामांना विनवणी केली की 'गरिबीपायी आमच्याहातून हे कृत्य घडले. आम्हाला तुम्ही काहींतरी काम द्या. आम्ही असे पुन्हा करणार नाही. वाघमामांनी त्यांचे अपराध पोटात घालून तात्पुरते लाकडें फोडण्याचे काम त्यांच्याकडे सोपविले. त्याप्रसंगातून वाघमामांची क्षमाशीलता तसेच साधुत्वहि प्रतिबिंबित झालेले होते. 'बिशप्स कँडल स्टीक' या गाजलेल्या इंग्रजी नाटकांतील 'बिशप'चाच हा भारतीय अवतार भासला.

वाघमामा गेले, तरी कीर्तीरूपाने ते मागे राहिले आहेत. त्यांच्या निधनाने संस्थेच्या कार्यात मोठीच पोकळी निर्माण झाली असून, संस्थेची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे ते गेल्याने अनेकांचा मार्गदर्शक, कुशल सल्लागार, जिव्हाळ्याचा आप्त-स्नेही आणि एक महान् भगवद्भक्त हरपला आहे.

• • •

# शिर्डी येथील दसरा उत्सव १९७५

ऑक्टोबर महिन्यात श्रीसाईबाबांचा पुण्यतिथी उत्सव आल्यामुळे बाहेर गावचे साईभक्तांची गर्दी बरीच होती. शाळा–कॉलेजांना दिवाळीची सुट्टी असल्यामुळे मुलामुलींच्या सहलीही बऱ्याच आल्या होत्या.

**दसरा उत्सव पहिला दिवस :–** सोमवार दि. १३–१०–७५ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. नित्य नेहमीप्रमाणे काकड आरती सुरू झाली. मोठ्या संख्येने साईभक्त आरतीला उपस्थित होते. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. समाधि मंदिरात सकाळी ६–३० वा. श्रींचे मंगलस्नान झाल्यावर नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत श्री. स. कृ. पुराणिकबुवा (आळंदी) पुणे यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारती नंतर ७–३० ते ९ पर्यंत व रात्री ९–३० ते १०–३० पर्यंत श्री. जितेंद्र अभिषेकी मुंबई यांचे सुश्राव्य गायन झाले. रात्री ९–१५ ते ११–३०, पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**दसरा उत्सव दुसरा दिवस** :– मंगळवार दि. १४–१०–७५ रोजी उत्सवाचा मुख्य दिवस. पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. साईनाथांचे पुण्यतिथीचा दिवस असल्यामुळे पहाटेपासूनच साईभक्तांची गर्दी होती. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची साईसच्चरित पारायण समाप्ति मिरवणूक द्वारकामाईतून समाधिमंदिरात आली त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी ९ वा. भिक्षा झोळी कार्यक्रम झाला. गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा करून भिक्षाझोळीत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ति अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १०–३० ते दुपारी १२ पर्यंत पुण्यतिथी कीर्तन झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला. दुपारी १ ते ३ पर्यंत श्रींची आराधनाविधि कार्यक्रम श्री. का. सी. पाठक रिसीव्हर यांचे शुभ हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी पुरोहितांना धोतरे उपरणी व सुवासिनींना खण दिले. सायंकाळी ५ वाजता सीमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींच्या निशाणाचे व शमीचे पूजन श्री. का. सी. पाठक यांनी केल्यावर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. ग्रामस्थ व साईभक्त कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. खंडोबा देवाचे दर्शन घेतल्यावर मिरवणूक शनिमंदिर, गणपतीमंदिर, महादेवाचे मंदिर, मारुती मंदिर मार्गे चावडी द्वारकामाईतून मंदिरात आली त्यानंतर धूपारती झाली.

धूपारती नंतर सायंकाळी ७–३० ते ९ वाजेपर्यंत श्रीकृष्ण बँड पथक मुंबई यांचा बँड वादनाचा कार्यक्रम झाला. रात्री ९–१५ ते १२ वाजेपर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आली. मिरवणूकीला सनई, चौघडा डफ, श्रीकृष्ण बँड पथक मुंबई, राहाता बँड पथक, स्थानिक बँड पथक वाद्यांबरोबरच भजन वगैरे कार्यक्रमही झाले. प्रतिवर्षाप्रमाणेच पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून करमणूकीचे कार्यक्रम केले. स्थानिक लोकांनी भारुड गारुड कार्यक्रम केले. कोळीलोकांच्या नाचगाणी कार्यक्रमात इतर साईभक्तांनीही भाग घेतला होता. अशा थाटात मिरवणूक मंदिरात आल्यावर भक्त मंडळींनी कलाकारांच्या कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव तिसरा दिवस** :– बुधवार दि. १५–१०–७५ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान ठिकाणी सकाळी ७–३० ते ८–३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. नित्यकार्यक्रमा व्यतिरिक्त सायंकाळी ४ ते ६